# रे.दि.मु.क्र. २११/२०१८ मधील नि. क्र. १४ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ याने सदरचा अर्ज त्याला दाव्याची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून त्याचे विरुद्ध दिनांक १२.०२.२०१९ रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल करून त्याची कैफियत अभिलेखावर स्विकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे. वादींतर्फे त्याचे म्हणणे प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूस दाखल करण्यात आले आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादीने अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादीस मे. कोर्टाकडून समन्स रुजू झालेनंतर ते रितसर वकिलामार्फत हजर झाले. परंतु दावेस वेळेत कैफियत/म्हणणे दाखल न केलेने त्याचे विरुद्ध विना कैफियतचा आदेश झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी हे दावेचे कामी वकिलामार्फत हजर झालेनंतर वादी नं. २ चे वडिलांनी मध्यस्थ पंचलोकांमार्फत या प्रतिवादीकडे तडजोड करू म्हणून तगादा लावला. यापूर्वी वादी नं. २ चे वडिलांनी या प्रतिवादीची बरेच वेळा फसवणूक केली होती. म्हणून त्यास प्रतिवादी तयार होईना. तेव्हा वादी नं. २ चे वडिलांनी मुचंडी गावी येवून तेथील पंच प्रतिष्ठित लोक जमा करून तडजोडीची भाषा सुरू केली. तेव्हा सदर कामी प्रतिवादी पंचांचे बोलणेवर विसंबून राहिला. त्यामुळे सदर प्रकरणांत तडजोडीत मिटेल म्हणून वकिलांची भेट घेवून कागदपत्रांची पूर्तता करून वेळेत कैफियत दाखल करू शकला नाही. त्यामुळे त्याचे विरुद्ध विनाकैफियतचा आदेश झाले आहे. दि. ११.०१.२०२० रोजी वादी नं. २ चे वडील मुचंडी गावी आले व तडजोडीच्या पंचांना घेऊन बैठक बोलावली. तेव्हा वादी नं. २ चे वडिलांनी सदर दावेचे कामी तडजोड करणेचे झालेस या प्रतिवादीने वादींना दहा लाख रूपये द्यावे असा प्रस्ताव ठेवला. त्यास या प्रतिवादीने नकार दिला व सदर बैठक मोडून कागदपत्रांची पूर्तता करून सदर कामी वादी नं. २ चे स्वच्छंद जीवन जगणेची तऱ्हा व त्यास त्यांचे वडिलांची पृष्टी याबाबत कैफियत मध्ये सविस्तरपणे

कथन करून वादीचा दावाच टेनेबल नसलेबाबत कथन केले आहे ते रेकॉर्डवर येणे न्यायाकरिता जरुरीचे आहे. प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर आलेने वादीचे काहीच नव्हेतर काडीमात्र देखील नुकसान होणार नाही. उलट या प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर आलेने न्यायदानाचे कामी मदतच होणार आहे. सबब झालेला विलंब माफ करून प्रस्तुत प्रतिवादी विरुद्ध झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल करून त्याची कैफियत अभिलेखावर स्विकारण्यात यावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादी मार्फत करण्यात आली आहे.

३) वादींतर्फे अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज मंजुरीस विरोध दर्शविला आहे. वादीतर्फे असे म्हणणे दाखल करण्यात आले आहे की, सदरचा अर्ज व त्यातील कथने हे वादींना मान्य व कबूल नसून यातील प्रतिवादीने जाणून बुजून विलंब केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा.

४) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा व प्रतिवादी नं. १ व २ यांचेमधील बक्षीसपत्र वादींवर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणेकरिता दाखल करण्यात आलेला आहे. दावा उभय पक्षकारांच्या स्थावर मिळकतीतील हक्क व हितसंबंधाबाबतचा आहे. प्रस्तुत प्रतिवादीने अर्जात नमूद केलेली त्याचे व वादीचे दरम्यान चाललेल्या कोर्टाबाहेरील आपसांत तडजोडी बाबतची असल्याने त्याच्या सत्यासत्यते अभावी या टप्प्यावर विचारात घेता येणार नाहीत. परंतु सदर कारणामुळे प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास विलंब झाला असे जे प्रतिवादीचे कथन आहे ते अजिबातच विचारात घेण्यासारखे नाही असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादीस त्याची कैफियत अभिलेखावर दाखल

करण्याची संधी देणे जरूरीचे वाटते. तसेच उभय पक्षकारांमधील वाद विषयाचे स्वरूप विचारात घेतले असता वाद विषयाचे अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारे प्रस्तुत प्रतिवादीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत निर्माण होवून प्रकरणांची अनेकता देखील होण्याची शक्यता आहे. सबब प्रस्तुत प्रतिवादीस त्याची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. सबब प्रतिवादीने अर्जासोबत विलंबाने दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीस समन्सची बजावणी दि. ०४.११.२०१८ रोजी झाल्यानंतर व त्याचे विरुद्ध दिनांक १२.०२.२०१९ रोजी विना कैफियतीचा आदेश झाल्यानंतर त्याने प्रस्तुतचा अर्ज दि. २०.०१.२०२० रोजी दाखल करेपर्यंत त्यास कैफियत दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादीने वादींना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादीने वादींना खर्चापोटी एकुण रक्कम रू. २००/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादीने वादींना खर्चाची एकुण रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादींना वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्याचे विरुद्ध दिनांक १२.०२.२०१९ रोजी झालेला विना कैफियतीचा आदेश

रद्द बातल करून त्यास लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्याने या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. अनुषंगिक आदेश निशाणी क्र. १ खाली पारित करण्यात यावा.

सही/–

स्थळ:– जत
दि. ०८.११.२०२१

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मुळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०८/११/२०२१. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः | ०८/११/२०२१. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०९/११/२०२१. |